## प्रकरण पाचवे

## सारांश, निष्कर्ष, शिफारशी व संभाव्य संशोधनाचे निर्देशन --

### प्रास्ताविक :

शिक्षक प्रशिक्षणाने समाजाच्या बदलत्या आकांक्षा, गरजा आणि मागण्या यांची दखल घेतली पाहिजे. त्यासाठी नवा शिक्षक हा कुशल, कार्यक्षम असावा, त्याच बरोबर तो परिणामकारक सुसंवादक, अध्ययन स्त्रोतांचा आरेखक, अध्ययनाला चालना देणारा प्रेरक व समाजाभिमुख असला पाहिजे. मात्र आजची शिक्षक प्रशिक्षणाची प्रक्रिया ही समाधानकारक नाही, ध्येय, विषयज्ञान, सराव व मूल्यमापन या सर्व विषयांचे दोष आहेत म्हणून शिक्षक प्रशिक्षणाची परिणामकारकता वाढविण्यासाठी प्रशिक्षणाचे कार्यक्रम अध्यापन प्रक्रिया, त्यावरील आधुनिक विचार आणि संशोधनावर आधारलेले पाहिजेत.

अध्यापन हे नियोजनबद्ध वर्तन आहे. वर्गातील प्रत्यक्ष अध्यापन हे नियोजनक्षमता व कार्यवाहीक्षमता या दोन्ही क्षमतांवर अवलंबून असते. नियोजनक्षमता ही नियोजन प्रक्रियेशी संबंधित आहे. त्यात पाठ नियोजन व पाठ नियोजनासाठी मार्गदर्शन या गोष्टी येतात.

सर्वसाधारण नियोजन म्हणजे पाठ टाचण काढणे असे मानले जाते, पण नियोजन करताना अनेक बौद्धिक प्रक्रिया मनामध्ये चालू असतात, यापैकी एक प्रक्रिया म्हणजे अध्यापनाचा मानसिक आराखडा तयार होणे ही आहे. जर मानसिक आराखडा सुस्पष्ट असेल तर अध्यापन नियोजनाप्रमाणे परिणामकारक होऊ शकेल. या दृष्टीने पाठ नियोजनाची प्रक्रिया आणि मार्गदर्शनाची प्रक्रिया यात महत्त्वपूर्ण बदल आवश्यक आहेत.

मात्र आज मार्गदर्शनाची अशी कोणतीच शास्त्रीय पद्धती अद्याप उपलब्ध नाही. विद्यार्थी-शिक्षकाच्या मनात अध्यापनाचा मानसिक आराखडा तयार झालेला आहे की नाही याची खात्री प्राध्यापक करुन घेतातच असे नाही. मार्गदर्शन

कसे करावे याचे कोणतेही प्रशिक्षण अथवा तत्त्वे उपलब्ध नाहीत. त्यामुळेच व्यक्तिभिन्न मार्गदर्शन व मार्गदर्शन देण्याच्या पद्धतीत फरक आढळतो.

मार्गदर्शन प्रक्रिया ही नियोजन क्षमतेत व बौद्धिक प्रक्रियेला चालना देणारी हवी. या दृष्टीकोनातून मार्गदर्शनाकडे पाहिले जात नाही, यासाठी मार्गदर्शनाच्या शास्त्रीय पद्धतीचा शोध घेतला पाहिजे. असा एक प्रयत्न श्री. पुजारी एस्. वाय. यांच्या संशोधनात आढळतो. त्यानी शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील सराव पाठ मार्गदर्शन देण्याच्या पद्धतींचा अभ्यास केला, त्यांच्या या संशोधनाचा एक महत्त्वपूर्ण निष्कर्ष म्हणजे मार्गदर्शनाची पद्धती ही व्यक्तीबरोबर व विविध विषयानुसार बदलते असे असले तरी मराठी अध्यापनाच्या पाठ नियोजन मार्गदर्शनाची पद्धती कशी असू शकेल ? ती इतर अध्यापनपद्धतींच्या पाठ मार्गदर्शनाहून कशी भिन्न असेल ? असे प्रश्न उपस्थित होतात, यासाठी विविध विषयांसाठी मार्गदर्शन पद्धतीचा तौलनिक अभ्यास करणे आवश्यक आहे.

प्रस्तुत संशोधिकेची अध्यापनपद्धती मराठी असल्यामुळे तिने पुढील विषय संशोधनासाठी निवडला आहे.

<u>समस्या विधान</u> : "मराठीच्या पाठनियोजनाची मार्गदर्शनपद्धती व अन्य विषयांच्या पाठनियोजनाची मार्गदर्शनपद्धती याचा तौलनिक अभ्यास"

<u>विशिष्ट पदांच्या व्याख्या</u> :

१) <u>अन्य विषय</u> -

बी. एड. महाविद्यालयात सर्वसामान्यपणे ज्या विषयांच्या अध्यापनपद्धतीं· सोय असते त्या अध्यापन-पद्धती होत. हिंदी, इंग्रजी, शास्त्र, गणित, इतिहास, भूगोल हे विषय बहुतेक सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आहेत.

२) <u>पाठ नियोजन मार्गदर्शन</u> -

सराव पाठाचे पाठ टाचण परिपूर्ण काढण्यासाठी तज्ज्ञ प्राध्यापकाकडून दिले जाणारे मार्गदर्शन.

३) <u>तौलनिक</u> -

मराठी अध्यापन मार्गदर्शनाच्या साधारण वैशिष्टयांची अन्य अध्यापन-पद्धतींच्या मार्गदर्शनाच्या वैशिष्टयांशी असलेल्या साम्य भेदाची तुलना.

संशोधनाची उद्दिष्टे --

१) मराठी व अन्य पद्धतीचे कसे मार्गदर्शन केले जाते यांचा शोध घेणे.

२) मराठी मार्गदर्शन व अन्य विषयांसाठी मार्गदर्शनाची पद्धती यांची तुलना करणे.

३) मराठी अध्यापन पाठ मार्गदर्शनाची पद्धती निश्चित करणे.

परिकल्पना :

प्रस्तुत संशोधन हे शोक स्वरुपाचे असल्याने येथे एकही परिकल्पना मांडण्यात आलेली नाही.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधन हे शोधक स्वरुपाचे असून त्यातील विविध घटकातील परस्पर संबंध शोधावयाचा असल्याने वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केलेला आहे.

या संशोधनासाठी खालील शैक्षणिक साधने वापरण्यात आली :--

१. पाठ मार्गदर्शन विश्लेषण गट पद्धती.

२. प्रश्नावली.

( वरील साधनांची सविस्तर माहिती प्रकरण क्र.३ मध्ये दिलेली आहे. )

कार्यपद्धती :

प्रत्यक्ष निरीक्षण व प्रश्नावली --

१) प्रत्यक्ष निरीक्षणासाठी सांगली जिल्ह्यातील पाच शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या पाठ मार्गदर्शनाचे ध्वनिमुद्रण केले.

२) प्राध्यापकांसाठी व विद्यार्थी शिक्षकांसाठी प्रश्नावली तयार केली, ती पाठ मार्गदर्शनातील विविध घटकांशी संबंधित होती.

या प्रश्नावल्या सांगली जिल्ह्यातील पाच शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील --

१. आजी विद्यार्थी-शिक्षक ( १९९२-९३ )

२. माजी विद्यार्थी-शिक्षक (१९९१-९२ )

व शिवाजी विद्यापठांतर्गत सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील

३. प्राध्यापक

यांना पाठविल्या.

३) त्यानंतर प्रत्येक विषयाचे ध्वनिमुद्रण लिहून काढले, त्यांचे पाठ मार्गदर्शन विश्लेषण गट पद्धतीनुसार केले. या विश्लेषणावरुन सात विषयांचे एकत्रित सात मॅट्रिक्स तयार केले. मार्गदर्शन घटकानुसार त्यांची टक्केवारी काढली व विषयानुसार विश्लेषण करुन निष्कर्ष काढले.

४) मॅट्रिक्सवरुन मार्गदर्शन पद्धतीत मार्गदर्शन कोणत्या क्रमानेदिले जाते हे पाहण्यासाठी फ्लॅन्डर्सच्या तत्त्वानुसार सात विषयांचे सात प्रवाह तक्ते तयार केले, त्यांचे विश्लेषण करुन विषयवार निष्कर्ष काढले.

५) वरील मार्गदर्शन टक्केवारीवरुन मराठी व अन्य विषयांच्या पाठ मार्गदर्शनाचे तौलनिक दर्शकांक काढले, या दर्शकांक विश्लेषणावरुन मराठी व अन्य पाठ मार्गदर्शनाचे तुलनात्मक निष्कर्ष काढले. (उदा. मराठी व हिंदी पाठ मार्गदर्शन, मराठी व इंग्रजी पाठ मार्गदर्शन इत्यादि )

६) त्याचप्रमाणे मराठी पाठ मार्गदर्शनाचा प्रवाह तक्ता व अन्य विषयांच्या पाठ मार्गदर्शनाचे प्रवाह तक्ते यांच्या निष्कर्षांवरुन तौलनिक निष्कर्ष काढले (उदा. मराठी पाठ मार्गदर्शन प्रवाह तक्ता व हिंदी पाठ मार्गदर्शन प्रवाह तक्ता याप्रमाणे )

७) प्रश्नावलीचे विश्लेषण, निरीक्षण व अर्थबोधन - प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी भरुन पाठविलेल्या प्रश्नावल्यांच्या प्रश्नांनुसार सारण्या तयार करुन प्रश्नांनुसार विषयवार निष्कर्ष काढले.

८) त्यानंतर वरीलप्रमाणे मराठी प्राध्यापकांच्या पाठ मार्गदर्शनाचे प्रश्नावलीनुसार आलेले निष्कर्ष व अन्य विषयांच्या प्राध्यापकांच्या पाठ मार्गदर्शनाचे प्रश्नावलीनुसार आलेले निष्कर्ष यांची तुलना केली ( उदा. मराठी-हिंदी, मराठी-इंग्रजी व साम्य, भेद याचे पृथक्करण केले.

९) यानंतर मराठी पाठ नियोजन मार्गदर्शन पद्धतीचे निष्कर्ष काढण्यात आले.

महत्त्वाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे :--

१) मराठी अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विषयज्ञान (पात्रे,कठीण शब्द,वाक्प्रचार,उदाहरणे,दाखले इ. ) या घटकावर अधिक चर्चा करतात.

२) मराठी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक प्राथमिक माहितीवर सविस्तर चर्चा करतात.

३) शिक्षक कृतीवर मराठी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक कमी बोलतात.

४) विषयज्ञानाखालोखाल पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे,शिक्षक कृती व मूल्यमापन या घटकावर भर देतात.

५) पूर्वज्ञान,स्वाध्याय,प्रश्न पद्धती या घटकांना मार्गदर्शनात कमी महत्त्व दिले जाते.

६) त्याचप्रमाणे शैक्षणिक साधनांचा वापर,प्रेरणा व हेतुकथन,अध्यापन-पद्धती,विद्यार्थी कृती व फलक लेखन या घटकावर अल्प प्रमाणात चर्चा करतात.

७) मराठी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शन काळात विद्यार्थी-शिक्षकाला अधिक बोलू देतात.स्वत: कमी बोलतात,

८) मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाच्या प्रतिसादाला होकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त करतात,मात्र ती विद्यार्थी-शिक्षकाच्या प्रतिसादाच्या तुलनेत कमी प्रमाणात असते.

९) मराठी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक होकाराच्या तुलनेत नकारात्मक प्रतिक्रिया कमी प्रमाणात व्यक्त करतात,मात्र काही वेळा व्यक्त केलेला नकार दीर्घकाळ असतो.

१०) त्याचप्रमाणे प्राध्यापक अपेक्षात्मक कृतीपेक्षा अधिक प्रमाणात होकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त करतात, म्हणजेच प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकांना अधिक बोलण्यास प्रोत्साहन देतात.

११) मार्गदर्शन काळात प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाचा खूपच सहभाग घेतात. मात्र एका मार्गदर्शनात अन्य विद्यार्थी-शिक्षकाना अल्प सहभाग घेतात.

१२) मार्गदर्शनामध्ये पूर्वज्ञान,प्रेरणा व हेतुकथन,आशय (पाठ्य-मुद्दे ), पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे,शिक्षककृती व

विद्यार्थी कृती, शैक्षणिक साधने, संकलन, फलक लेखन, उपयोजन व मूल्यमापन याप्रमाणे घटकांना क्रम देतात.

१३) वरील घटकामध्ये मराठी पाठाचे मार्गदर्शक प्राध्यापक (१) पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे या घटकाला मार्गदर्शनात सर्वात जास्त वेळ देतात व त्या खालोखाल (२) पाठय-मुद्दे ३) शिक्षक-कृती - विद्यार्थी कृती या घटकांना वेळ देतात.

१४) त्याचप्रमाणे (८) शैक्षणिक साधने (९) उपयोजन, (१०)संकलन या घटकांना सर्वांत कमी वेळ देतात.

१५) मूल्यमापन या घटकावर प्राध्यापक स्वत: मार्गदर्शन करतात.

१६) चर्चेच्या घटकामध्ये मार्गदर्शक प्राध्यापक सांगड घालण्याचा प्रयत्न करीत नाहीत. प्रत्येक घटकाचे तुटक तुटक मार्गदर्शन देण्याची प्रवृत्ती आहे.

१७) मराठी पाठाचे मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनाची सुरवात पूर्वज्ञानापासून करतात. पूर्वज्ञानावरील चर्चेत पूर्वज्ञान व नवीन आशय यातील सुसंगती पाहतात. विद्यार्थी-शिक्षकाला पूर्वज्ञानासंबंधी मागील संदर्भ विचारतात, तो त्याला देता आला नाही तर संदर्भाचे वाचन करण्यास, संदर्भ शोधण्यास सांगतात.

१८) प्रेरणेवरील चर्चेत विद्यार्थी-शिक्षकाला प्रेरणा (प्रस्तावना )सुचत नसल्यास मराठी पाठ मार्गदर्शकात ती स्वत: सुचविण्याची प्रवृत्ती दिसते. त्याचप्रमाणे प्रेरणेवरील चर्चेत घटकानुरूपता, प्रेरणा देणाऱ्या कृती, प्रस्तावना, प्रेरणेची हेतुकथनाशी सांगड व प्रेरणेचा परिणाम या पैलूंची क्रमानुसार चर्चा होते.

१९) मराठी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक(१) आशय, (२) पाठातील अपरिचित शब्द (३) वाक्प्रचार व म्हणी (४) कल्पना सौन्दर्य (५) विचार सौन्दर्य, (६) व्यक्तिरेखा या क्रमाने विविध माध्यिक अंगावर चर्चा करतात. चर्चेच्या दरम्यान विद्यार्थी-शिक्षकाला अवांतर वाचन देण्याची प्रत्येक मुद्दयांचे स्पष्टीकरण विचारण्याची प्रवृत्ती दिसते. विद्यार्थी-शिक्षकाला मुद्दयांचे स्पष्टीकरण येत नसेल तर त्यावर चर्चा, मार्गदर्शन करतात. पाठाचा आशय सांगतात, मात्र पाठय-घटकाशी निगडित आशय सांगत नाहीत.

२०) उद्दिष्टांवरील चर्चेमध्ये मराठी पाठाचे मार्गदर्शक प्राध्यापक पाठयांशानुरुपता यावर चर्चा करतात. पाठय घटकाला अधिक उद्दिष्टांची गरज असल्यास ती विद्यार्थी-शिक्षकाला काढण्याची सूचना देतात. विद्यार्थी-शिक्षकाच्या उद्दिष्टबदलामागील कारण सांगण्याची प्रवृत्ती दिसते.

२१) विद्यार्थी-शिक्षकाने पाठ नियोजनात शैक्षणिक साधनांचा समावेश केला नसेल तर मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक ती दाखविण्यास सांगतात, त्यांच्या उपलब्धतेविषयी माहिती देण्याची व कल्पना सुचविण्याची प्रवृत्ती दिसते.

२२) शिक्षक कृतीवर चर्चा करताना लिहिलेल्या कृतीपैकी आदर्श वाचन, हेतुकथन, आशय व स्पष्टीकरण, प्रश्न, शैक्षणिक साधने या बाबींवर चर्चा करतात, या चर्चेमध्ये (१) कथन, स्पष्टीकरण, (२) प्रश्न (३) विद्यार्थी सहभाग (४) शैक्षणिक साधने याप्रमाणे घटकांचा क्रम देतात.

२३) मराठी पाठाचे मार्गदर्शक प्राध्यापक स्वाध्यायावरील चर्चेत स्वाध्याय उद्दिष्टानुरुप, विषयानुरुप, पाठय विषयाचे दृढीकरण करणारा, वयोगटानुसार असणे या बाबी पाहतात. विद्यार्थी-शिक्षकाच्या स्वाध्यायात बदल करताना तो स्पष्टीकरण, सूचना यातून करतात.

२४) मूल्यमापन चर्चेमध्ये प्रश्न उद्दिष्टानुसार, पाठयांशानुसार, प्रश्न रचना, प्रश्न स्वरुप, प्रश्न पुरेसे असणे ते विद्यार्थी कुवतीनुसार असणे यावर भर दिलाजातो. तसेच प्राध्यापक मूल्यमापन प्रश्नांचे स्वरुप सांगतात.

२५) फलक लेखन चर्चेमध्ये मराठी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक प्रामुख्याने मुद्देसूदपणा, शुद्ध, रेखीव, आकर्षक लेखन, हेतुप्रश्न यावर भर देतात. तसेच फलक लेखनातील सुव्यवस्थेवर, त्यातील त्रुटी, दोष यानुसार सूचना देतात.

२६) विद्यार्थी-शिक्षकाचे पाठ नियोजन चुकीचे वाटल्यास आहे त्या पाठ टाचणात सुधारणा करतात. पूर्ण बदलत नाहीत.

२७) विद्यार्थी-शिक्षकाने मार्गदर्शनाच्यावेळी प्राध्यापकांनी विचारलेल्या प्रश्नांना चुकीची उत्तरे दिल्यास मराठी पाठ मार्गदर्शकात प्रश्न विचारुन त्याला बरोबर उत्तराप्रत आणण्याची प्रवृत्ती दिसते.

२८) मराठी पाठाचे मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाकडून अधिक वाचन,अभ्यास,शैक्षणिक साधने यांचा आग्रह धरतात.

२९) मराठी पाठाचे मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला पाठ टाचण न काढता किंवा उद्या पाठ असताना मार्गदर्शनास आल्यास मार्गदर्शन देत नाहीत. कच्च्या टाचणाचा आग्रह धरतात. मात्र टाचण त्रौटक असेल तर अपु-या मुद्दयावर चर्चा करतात,अडचणी विचारतात व नंतर टाचण पूर्ण करण्यास सांगतात.

३०) प्राध्यापकांच्या बोलण्यामध्ये विद्यार्थी-शिक्षकाला अकस्मात प्रतिसाद, मते व्यक्त करण्यास स्वातंत्र्य दिले जाते.प्राध्यापक हेतुत: प्रश्न विचारुन प्रतिसाद घेत नाहीत,त्यामुळे चर्चा अल्पकाळ होते.

या सर्व निष्कर्षांची अन्य विषयाच्या सर्व निष्कर्षांशी तुलना केली, या तुलनेनंतर अनुभवी तज्ज्ञ मराठी पाठ मार्गदर्शकांशी मराठी पाठ मार्गदर्शक तत्त्वासंबंधी चर्चा केली, या सर्वा आधारे मराठी पाठ मार्गदर्शक तत्त्वाची निश्चिती केली,ही मार्गदर्शक तत्त्वे पुढील प्रमाणे :--

## मराठी पाठ मार्गदर्शक तत्त्वे व पद्धतीची निश्चिती --

१) आशय,उद्दिष्टे,अध्ययन अनुभूती (शिक्षक कृती व विद्यार्थी कृती ) व मूल्यमापन या चार घटकांना एकोणीय प्रतिमानानुसार मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये महत्त्वपूर्ण स्थान देण्यात यावे.

२) मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये आशय आणि उद्दिष्टे यांचा स्वतंत्र व क्रमाने विचार न करता एकत्रित व अतूटपणे विचार केला जावा.

३) मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये उद्दिष्टे ,शिक्षक कृती व मूल्यमापन यांच्या तुलनेत विषयज्ञान या घटकावर अधिक भर दिला जावा.

४) मराठी भाषेच्या संदर्भात पाठाचा घटक,उपघटक,इयत्ता,शाळा, तिची गुणवत्ता,परिसर,विद्यार्थ्यांची गुणवत्ता व त्यांचा परिसर,भाषिक स्तर या बाबींना महत्त्वाचे स्थान असण्याची शक्यता आहे म्हणून मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये प्राथमिक माहितीवर सविस्तर चर्चा करावी.

५) मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये पूर्वज्ञान या सुरवातीच्या घटकावर आवश्यक व मर्यादित भर देऊन त्याची अपरिहार्यतेने प्रेरणेशी सांगड घालावी.

६) प्रस्तावना ही अनुरुप,प्रेरक,परिणामकारक असावी,यासाठी मार्गदर्शन करावे. मात्र अशी प्रेरणा विद्यार्थी-शिक्षकाला न सुचल्यास नमुना म्हणून मार्गदर्शकाने स्वत: योग्य प्रेरणा सांगावी.

७) मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये शैक्षणिक साधनांची मर्यादित व आवश्यकतेनुसार चर्चा करावी.जेथे आवश्यकता आहे तेथे शैक्षणिक साधनांचा आग्रह धरावा.या चर्चेमध्ये पाठ मार्गदर्शक प्राध्यापकांनी शैक्षणिक साधनांच्या उपलब्धतेची माहिती द्यावी,त्यांच्या कल्पना सुचवाव्यात व ती साधने प्रत्यक्ष कशी वापरावीत याचे मार्गदर्शन करावे.

८) मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये विषयज्ञान या घटकावर अधिक वेळ चर्चा केली जावी व ती चर्चा भाषा प्रभुत्व,साहित्याची जाण व नैतिक मूल्यसंस्कार या दृष्टीने होणे आवश्यक आहे.

९) मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये पाठाच्या उद्दिष्टात विविधता व संख्यात्मक वाढ करण्यासाठी मार्गदर्शन करावे.भाषिक अंग,साहित्यिक विचार व भावात्मक क्षेत्राचा विचार केला जावा.

१०) उद्दिष्टांच्या मार्गदर्शनासाठी चर्चेचा अवलंब करावा.विशेषत: विद्यार्थी-शिक्षकाने लिहिलेल्या उद्दिष्टात बदल सुचविल्यास त्या मागील कारणे स्पष्ट करावीत.

११) मराठी पाठ मार्गदर्शनात अध्यापनपद्धतीवर मर्यादित व आवश्यक तितकी चर्चा करावी,ही करत असताना पाठ टाचणामध्ये त्या पद्धतींचा उल्लेख केला जाईल याचा आग्रह धरावा.

१२) प्रश्न पद्धती या घटकावर अन्य विषयांच्या तुलनेत मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये कमी चर्चा होते,विषय प्रतिपादनामध्ये प्रश्न-साखळी,कथन, स्पष्टीकरण,वर्णन,उदाहरणे,दाखल्यांचा वापर मराठीत जास्त असल्याने मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये प्रश्न पद्धतीवर मर्यादितच भर द्यावा.

१३) मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये शिक्षक कृती हा एक महत्त्वाचा घटक असून त्यामध्ये आदर्शवाचन,उच्चार,हेतुकथन,आशय, त्याचे स्पष्टीकरण,प्रश्न, शैक्षणिक साधने इ.बाबींचे घटकानुसार सखोल मार्गदर्शन करावे.आवश्यक तेव्हा पाठ मार्गदर्शकाने चर्चेपेक्षा स्वत: मार्गदर्शन करण्यावर भर द्यावा.

१४) मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये मूल्यमापन हा महत्त्वपूर्ण घटक असून त्यामध्ये विचारावयाच्या प्रश्नांचे स्वरुप मार्गदर्शकांनी स्पष्ट करावे.

१५) मूल्यमापनात विचारावयाच्या प्रश्नांमध्ये दोन प्रकारच्या प्रश्नांचा समावेश करावा :--

अ) पाठ्यांशाची उजळणी करणारे प्रश्न व

ब) पाठ्यांशाव्दारे करावयाच्या संस्काराशी (भावात्मक अंगाशी ) निगडित प्रश्न.

या प्रश्नांची निश्चिती करताना चर्चेव्दारे ते निश्चित करता आले तर चांगलेच,अन्यथा नमुन्यादाखल स्वत: असे प्रश्न सांगावेत.

१६) मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये स्वाध्यायावर मर्यादित व आवश्यक तितकीच चर्चा करावी. या चर्चेमध्ये स्वाध्यायात विविधता कशी आणता येईल याविषयी मार्गदर्शन करावे.

१७) मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये फलक लेखन चर्चेसाठी मर्यादित व आवश्यक तितकाच वेळ द्यावा या चर्चेमध्ये म्हणी,शब्द व वाक्प्रचार,शुद्धलेखन यांची चर्चा करावी व त्रुटी व चुका दुरुस्त कराव्यात.

१८) मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये प्राध्यापकांनी कमी प्रश्न विचारुन विद्यार्थी-शिक्षकाला अधिक बोलते करावे,विद्यार्थी-शिक्षकाच्या प्रतिसादावर प्रामुख्याने होकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त करावी.

<u>शिफारशी</u> --

सदर संशोधनात प्राप्त झालेल्या निष्कर्षांवरुन व मिळालेल्या अनुभवांनी पुढील संशोधन कार्यासाठी खालील शिफारशी विषय सुचविण्यात आलेले आहेत. :--

(१) शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी --

१.सराव पाठ मार्गदर्शनासाठी उद्बोधन वर्ग भरवावेत.

२.विषयवार पाठ मार्गदर्शनासंबंधी प्राध्यापक, विद्यार्थी-शिक्षक यांच्यामध्ये चर्चासत्राचे आयोजन करावे.

३.पाठ मार्गदर्शन सुगम होण्याच्या दृष्टीने संशोधन प्रकल्प हाती घ्यावेत.

४.प्राध्यापकांना पाठ मार्गदर्शनासाठी विद्यार्थी-शिक्षकांची संख्या निश्चित करावी.

५.पाठ मार्गदर्शन,त्याचे निरीक्षण व पुन्हा त्यावर मार्गदर्शन असा मार्गदर्शन कृतीचा पाठपुरावा करावा.

(२) विद्यापीठ व अभ्यासमंडळे --

१.सर्व विषयांनुसार पाठ मार्गदर्शन पद्धतीची निश्चिती करण्यासाठी संशोधन प्रकल्प हाती घ्यावा.

२.सराव पाठ मार्गदर्शन पद्धतीच्या अभ्यासासाठी उद्बोधन वर्ग भरवावेत.

३.पाठाच्या टाचणाचा एक स्थूल आराखडा सर्व महाविद्यालयांना पुरवावा (कारण महाविद्यालयानुसार त्यात भिन्नता आहे )त्यातून मार्गदर्शन-पद्धती मधील मतभिन्नता टाळावी.

४.मराठी पाठ मार्गदर्शनाला पूरक साहित्य म्हणून मराठी विषयातील विविध पाठ्य घटक,काव्य, गद्य, नाटक, निबंध इ.नुसार पाठ टाचणांचे नमुने तयार करणारे कृतिसत्र (वर्कशॉप)आयोजित करावे असे मराठीच्या विविधंगांनीहोणा-या पाठांचे पाठ टाचण नियोजनाचे नमुने तयार करून ते प्रत्येक शिक्षणशास्त्र महाविद्यालयाला पुरवावेत,हेच अन्य विषयांच्याही बाबतीत करण्यास हरकत नाही.

पुढील संशोधनासाठी विषय :

१) प्रस्तुत संशोधनामध्ये मराठी विषयास पाठ मार्गदर्शन देणारे व

अन्य विषयांस पाठ मार्गदर्शन देणारे प्राध्यापक यांच्या पाठ नमुन्यांचा अभ्यास केला.यातून मराठी पाठ मार्गदर्शन देणाऱ्या प्राध्यापकांची मार्गदर्शन पद्धती यामध्ये पूर्ण फरक असतो असे सांगता येत नाही. तसेच पूर्ण साम्य असते असेही सांगता येत नाही असे समजून आले,प्रत्येक विषयाच्या पाठय वस्तुनुसार व प्राध्यापकांच्या व्यक्तिभिन्नतेनुसार फरक व साम्य आढळते,यासाठी एकेका विषयावर संशोधन होणे आवश्यक आहे.

२) प्रत्येक विषयाच्या वेगवेगळ्या अध्यापनपद्धती आहेत.सध्या हर्बार्टच्या पद्धतीनुसार मार्गदर्शन दिले जाते.परंतु अध्यापन-पद्धती,विषय यात बदल झाला की मार्गदर्शनात बदल करावा लागतो,म्हणून विषय व पद्धतीनुसार पाठ मार्गदर्शन पद्धतीचा अभ्यास करावा.

३) प्रस्तुत संशोधनामध्ये पाठ मार्गदर्शनाच्या प्रत्यक्ष निरीक्षणासाठी पाच शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील सर्व विषयांचे (३७) प्राध्यापक निवडले,हा गट लहान आहे म्हणून व्यापक प्रमाणात संशोधन करावे व त्यामध्ये अधिक प्राध्यापकांचा समावेश करावा.

४)प्रस्तुत संशोधनात मराठी पाठ मार्गदर्शन पद्धतीच्या अभ्यासासाठी प्रत्यक्ष निरीक्षणासाठी पाच शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील पाच प्राध्यापकांची निवड केली व प्रश्नावलीद्वारे पाठ मार्गदर्शक प्राध्यापकांची सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राध्यापक,तसेच सांगली जिल्ह्यातील पाच शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील १०.०० टक्के आजी,५.०० टक्के माजी विद्यार्थी-शिक्षकांची निवड केली.हा निवडलेला गट लहान,म्हणून व्यापक प्रमाणात संशोधन करावे व त्यामध्ये अधिक प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांचा समावेश करावा.

५) मराठी पाठ मार्गदर्शनाच्या संदर्भात कल्पना न देता मार्गदर्शन कसे दिले जाते या विषयी प्रत्येक शिक्षणशास्त्र महाविद्यालयाने स्वतंत्र अभ्यास हाती घ्यावेत,म्हणजे पाठ मार्गदर्शनाची अधिक माहिती मिळू शकेल.याप्रमाणे प्रत्येक विषयाच्या पाठ मार्गदर्शन संदर्भात अभ्यास हाती घेता येऊ शकेल.

६)पाठ मार्गदर्शनाची पद्धती निश्चित झाल्यानंतर प्राध्यापकांना प्रशिक्षण देऊन त्यांच्या मार्गदर्शनात दिसून येणारा फरक पहावा.

७) विषयानुसार,अध्यापन-पद्धतीनुसार मार्गदर्शन देण्याच्या पद्धतीत फरक पडतो का ? याचा अभ्यास करावा.

८) मार्गदर्शनाची तत्त्वे निश्चित झाल्यानंतर अनेक व्यक्तींच्या मार्गदर्शनात काही फरक पडतो का ? ते पहावे.

९) प्रस्तुत संशोधनामध्ये परिणामकारक मराठी पाठ मार्गदर्शक व अल्प परिणामकारक पाठ मार्गदर्शक यांचा तौलनिक अभ्यास केलेला नाही,तो करण्यात यावा.

१०) या संशोधनातून जी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आलेली आहेत त्यानुसार मार्गदर्शन दिले असता पाठ मार्गदर्शनाची गुणवत्ता वाढते का ? व त्यामुळे पाठ नियोजन व अध्यापन यांचीही गुणवत्ता वाढते का ? याचा शोध घ्यावा.

११) शास्त्र व मराठी पाठ नियोजनासाठीच्या मार्गदर्शनाच्या आकृतीबंधात विलक्षण साम्य संशोधिकेला दिसून आलेले आहे. म्हणजेच त्यांच्या आशयातील भिन्नतेचा शोध घ्यावा लागेल तो पुढील संशोधनाचा भाग होऊ शकेल.

१२) कालखंडानुसार पाठमार्गदर्शकाच्या पद्धतीत फरक पडू शकतो तो आशय आणि आकृतीबंध या संदर्भात कसा आणि कितपत पडतो, याचाही शोध घेणे आवश्यक आहे.